## प्रेस नोट दिनांक २१/०४/२०१९

## खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

### लेदर पाकिट हरविलेल्या इसमाचा शोध घेवून त्यास लेदर पाकिट व त्यामधील वस्तु सुखरूप परत.

दि. २०.०४.२०१९ रोजी खडक पोलीस ठाणे अंकित फडगेट पोलीस चौकीस दिवसपाळी कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी पो.शि. ७७२४ पवार व पो.शि. वाघमारे हे चौकी हद्दीत पेट्रोलींग करीत असताना महाराणा प्रताप उद्यान बाजीराव रोड येथे एक लेदरचे पाकिट बिनधनी अवस्थेत मिळुन आले. नमुद कर्मचारी यांनी सदरचे पाकिट ताब्यात घेवून सदर ठिकाणी कोणाचे हरविले याबाबत चौकशी करीत असताना काहीएक माहिती मिळुन आली नाही. नमुद कर्मचारी यांनी पाकिटमधील वस्तुंची पाहणी केली असता, त्यामध्ये दोन ए.टी.एम. कार्ड व तीन क्रेडिट कार्ड हे त्यांचे पासवर्डसह त्यामध्ये असल्याचे निदर्शनास आले.

नमुद कर्मचारी यांनी पाकिटमधील व्हीजीटींग कार्डमधील मोबाईल नंबरवर संपर्क साधुन खातरजमा केली असता, सदरचे पाकिट हे हुजेफा पुनावाले यांचे असल्याचे समजले. नमुद इमसास पोलीस चौकी येथे बोलावुन घेवून त्याबाबत योग्य ती खातरजमा करून हरविलेले लेदर पाकिट त्यामधील वस्तुंसह मुळमालक श्री. हुजेफा पुनावाले यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

ता. २१/०४/२०१९

**(राजेन्द्र मोकाशी)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.

